# प्रतिज्ञापत्र

मी वय वर्षे राहणार
याद्वारे शपथपूर्वक घोषित करतो की, मी दिनांक पासून केबल दूरचित्रवाणी ऑपरेटरचा व्यवसाय करीत आहे. मी ज्या विभागात जोडण्या दिल्या आहेत त्याची माहिती सोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविली आहे.

२. मी घोषित करतो की, वरील कार्यक्षेत्रात मी आज दिनांक रोजी एकूण इतक्या जोडण्या दिल्या असून, जोडणीधारकांची यादी सोबतच्या प्रपत्र अ मध्ये दिली आहे.

३. मी घोषित करतो की, मी प्रत्येक जोडणीधारकाकडून रुपये इतकी रक्कम मासिक/तिमाही/अर्धवार्षिक/वार्षिक वर्गणी म्हणून घेत असून त्याचा तपशील जोडणीधारकाच्या नावासमोर प्रपत्र अ मध्ये दर्शविला आहे.

४. मी घोषित करतो की, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ व तदांतर्गत मुंबई करमणूक शुल्क नियम, १९५८ यातील तरतुदी यांचे तसेच केबल टेलिव्हिजन नेटवर्कस् (रेग्युलेशन) ॲक्ट, १९९५ मधील तरतुदींचे आणि सार्वजनिक हितार्थ जिल्हाधिका-यांनी दिलेल्या सूचनांचे मी पालन करीन. वरील अधिनियमांतील व त्याखालील नियमामधील तरतुदींचा माझ्याकडून भंग झाल्यास मी दंडनीय कारवाईस पात्र ठरेन.

५. मी घोषित करतो की, मी दिलेल्या सर्व जोडण्यांची माहिती सोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविली असून, त्यावर देय असलेल्या करमणूक शुल्काची रक्कम नियमितपणे भरीन.

६. मी आणखी असेही घोषित करतो की, मी याद्वारे दिलेली जोडण्यांची माहिती खरी असून, ती खोटी असल्याचे आढळल्यास मी माझ्याविरुध्द फौजदारी कारवाई होण्यास पात्र ठरेन.

सोबत : प्रपत्र अ.
दिनांक :

प्रतिज्ञापत्रकाची सही

माझ्यासमोर,

: जिल्हाधिकारी / तहसिलदार.
:

(टिप - १) हे प्रतिज्ञापत्र २० रुपयांच्या मुद्रांक कागदावर टंकलिखित करावे.
२) परि.२ मध्ये प्रतिज्ञापत्राचा दिनांक नमूद करावा.